दि.२७/०८/२०२३

**प्रसिध्दी पत्रक**

आरोपी श्री. संतोष गिरजाराम वाघ, वय ४४ वर्षे, व्यवसाय नोकरी पोलीस अंमलदार, नेमणुक पोलीस ठाणे एम.आय.डी.सी. वाळुज,औरंगाबाद शहर यांनी तक्रारदार यांच्याकडे दिनांक 27/08/2023 रोजी तडजोडी अंती 1,500/- रुपये लाचेची मागणी करणारा लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद यांच्या जाळ्यात

| | | |
|---|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | :- | औरंगाबाद |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | :- | पोलीस ठाणे एम.आय.डी.सी वाळुज औरंगाबाद शहर |
| आरोपी यांचे नाव व पत्ता | :- | श्री. संतोष गिरजाराम वाघ, वय ४४ वर्षे, व्यवसाय नोकरी पोलीस अंमलदार, नेमणुक पोलीस ठाणे एम.आय.डी.सी. वाळुज,औरंगाबाद शहर |
| लाच मागणी रक्कम | :- | प्रथम 2,000/- लाच मागणी करुन तडजोडी अंती मागणी केलेली रक्कम- 1,500/- रुपये. |
| सापळा अधिकारी | :- | श्री. संतोष घोडके, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद |
| लाच मागण्याचा हेतु | :- | प्रतिवादी यांना समन्स तामील करुन मा. न्यायालयात अहवाल पाठविण्यासाठी. |
| थोडक्यात माहिती | :- | यातील तक्रारदार यांनी चेक बाऊंन्स प्रकरणी मा. न्यायालय औरंगाबाद येथे कलम 138 नुसार दावा दाखल केलेला आहे. सदर दाव्यामध्ये सदर दाव्यामध्ये मा.न्यायालयाने काढलेले समन्स प्रतिवादी यांना तामील करुन मा.न्यायालयास रिपोर्ट सादर करण्यासाठी यातील आरोपी लोकसेवक यांनी तक्रारदार यांच्याकडे प्रथम 2,000/- रुपये लाचेची मागणी करुन यापुर्वीच 500/- रुपये स्विकारले होते. आज दिनांक 27/08/2023 रोजी पंच साक्षीदार यांच्या समक्ष प्रत्यक्ष तक्रारदार यांचेशी समन्स तामील बाबत बोलणी करुन 1500/- रुपये लाचेची मागणी केली आहे.<br>त्यावरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद तर्फे दि. 27/08/2023 रोजी सापळा आयोजीत केला असता, आरोपी लोकसेवक श्री संतोष गिरजाराम वाघ, पो.अं. यांना तक्रारदार यांचा संशय आल्याने आरोपी लोकसेवक यांनी तक्रारदार यांचेकडुन लाचेची रक्कम स्विकारण्यास नकार दिला. त्यानंतर आरोपी लोकसेवक यांना ताब्यात घेण्यात आले आहे. त्यांचे विरुध्द पोलीस स्टेशन एम.आय.डी.सी वाळुज औरंगाबाद शहर येथे तक्रारदार यांचे फिर्यादी वरुन लाचमागणीचा गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालु आहे. |

सदर कारवाई पोलीस अधीक्षक मा.संदिप आटोळे, अपर पोलीस अधीक्षक मा. विशाल खांबे, पोलीस उप अधीक्षक राजीव तळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री संतोष घोडके यांनी केली आहे. त्यांना सदर कारवाई कामी पोलीस हवालदार रविंद्र काळे, पोअं. विलास चव्हाण, चालक चांगदेव बागुल यांनी मदत केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेशी संपर्क साधावा.


संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद
ई- मेल :- sp1acbaurangabad@gmail.com, 2) dyspacbabad@gmail.com
ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :- acbmaharashtra.net संपर्क क्रं. :- 0240-2344050, टोल फ्रि क्रं. 1064,
पोलीस अधीक्षक :- 9923023361 अपर पोलीस अधीक्षक :- 8788644994
पोलीस उप अधीक्षक :- 8668752530


( राजीव तळेकर )
पोलीस उप अधिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,औरंगाबाद.